आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी – वेळ सायंकाळी ६.००)
रविवार, दिनांक : २१ जुलै, २०२४

ठळक बातम्या

1. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला उद्या पासून सुरुवात- मंगळवारी अर्थमंत्री निर्मला सीतारामन सादर करणार २०२४-२५ चा केंद्रीय अर्थसंकल्प.

2.'या विधानसभा निवडणुकीत आजपर्यंतचा सर्वांत मोठा विजय मिळवत भाजपच्या नेतृत्वात महायुतीचं सरकार बनेल' - पुण्यात झालेल्या महाअधिवेशनात केंद्रीय मंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन.

3.विदर्भात अनेक ठिकाणी मुसळधार पावसामुळे पूरसदृश्य स्थिती - चंद्रपूर आणि भंडारा जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी.

4.देशभरात गुरुपौर्णिमा विविध कार्यक्रमांनी साजरी.

#########

सर्वपक्षीय बैठक

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी सरकानं बोलावलेली सर्वपक्षीय बैठक आज दिल्लीत पार पडली. बैठकीदरम्यान, संसदेच्या दोन्ही सभागृहांच कामकाज सुरळीत चालाव यासाठी सर्व राजकीय पक्षांनी सहकार्य करण्यचं आवाहन सरकारन केलं आहे. केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, जेपी नड्डा, चिराग पासवान, रामदास आठवले आणि काँग्रेस नेते जयराम रमेश, राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल, द्रमुक नेते टीआर बालू आणि तिरुची शिवा, AI MIM चे खासदार असदुद्दीन ओवेसी यांचा या बैठकीत सहभाग होता. संसदेच अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्या सुरू होणार असून मंगळवारी अर्थमंत्री निर्मला सीतारामन २०२४-२५ चा केंद्रीय अर्थसंकल्प लोकसभेत सादर करतील. नरेंद्र मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील हा पहिलाच अर्थसंकल्प असेल. हा अर्थसंकल्प सरकारच्या दूरगामी धोरणांचा आणि भविष्यवादी दृष्टीचा एक प्रभावी दस्तऐवज असेल असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला संबोधित करताना केलं होतं.

भाजप संमेलन पुणे

'कार्यकर्त्यांनी हताश होण्याची गरज नाही. महाराष्ट्रातील येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत आजपर्यंतचा सर्वांत मोठा विजय मिळवत भाजपच्या नेतृत्वात महायुतीच सरकार येणार आहे'- असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री आणि भाजप नेते अमित शहा यांनी व्यक्त केला. महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज पुण्यात भारतीय जनता पक्षाचं महाअधिवेशन पार पडलं. या अधिवेशनात 5 हजारांवर कार्यकर्ते सामील झाले होते. या अधिवेशनाच्या समारोपीय भाषणात विरोधी पक्षांवर हल्ला चढवत 'या देशाची महान रचना केवळ भाजपचं करू शकतो' असं शहा म्हणाले. आम्ही देशातील नक्षलवाद, आतंकवाद

संपवला. विरोधकांनी आरक्षणाबाबत खोटा प्रचार केला मात्र मागील १० वर्षांत केंद्रातील भाजप सरकारनं आरक्षणाला बळकटी दिली आहे, असंही शहा म्हणाले. तत्पूर्वी झालेल्या सत्रात बोलतांना 'लोकसभा निवडणुकीत आम्ही फार कमी फरकाने हरलो आहोत. कार्यकर्त्यांच्या मदतीने हा फरक विधानसभा निवडणुकीत मिटवत महायुतीचं सरकार महाराष्ट्रात पुन्हा येईल' असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी केलं. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, माजी मंत्री रावसाहेब दानवे,आमदार आशिष शेलार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या अधिवेशनाचं सकाळी उद्घाटन झालं.

आमदार अपात्रता सुनावणी

राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षांच्या फुटीनंतर, आमदार अपात्रेबाबत विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या विरोधात उद्धव ठाकरे गट आणि शरद पवार गटानं सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांवर येत्या मंगळवारी म्हणजेच २३ जुलैला सुनावणी होणार आहे. यासंदर्भात झालेल्या मागच्या सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयानं राहुल नार्वेकर यांना संबंधित दस्तऐवज सादर करण्याचे निर्देश दिले होते. या सुनावणीत हे दस्तऐवज सादर केले जाण्याची शक्यता आहे.

वारसा परिषद

जागतिक वारसा समितीचं ४६ वं अधिवेशन आजपासून नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं सुरू होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संध्याकाळी ७ वाजता याचं उद्घाटन होणार आहे. भारतात प्रथमच नवी दिल्ली इथं जागतिक वारसा समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात येणार असून भारतासाठी ही अत्यंत आनंदाची बाब असल्याचं मोदी यांनी समाज माध्यमांवर म्हटलं आहे. देशाचा वारसा जतन करण्याच्या मार्गांवर विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी ही बैठक एक महत्त्वाचं व्यासपीठ असल्याचंही ते म्हणाले.

सामंजस्य करार

केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री, डॉ. वीरेंद्र कुमार यांच्या अध्यक्षतेखाली विविध स्टार्टअप्स आणि खाजगी संस्थांसह अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या राष्ट्रीय संस्था आणि संयुक्त प्रादेशिक केंद्रे (CRCs) यांच्यात उद्या सामंजस्य करार करण्यात येणार आहे. नवी दिल्ली इथं सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण विभागाद्वारे आयोजित या कार्यक्रमात शारीरिक आणि बहुविध अपंगत्व क्षेत्रांसाठी 70 हून अधिक सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली जाईल.

## नीट-यूजी

नीट-यूजी प्रश्नपत्रिका फुटल्या प्रकरणी केंद्रीय अन्वेषण संस्थेने आणखी ३ संशयितांना अटक केली आहे. यामध्ये मुख्य सूत्रधार शशिकांत पासवानचा समावेश आहे. हे तिघे भरतपूर मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी आहेत. हे सर्व जण प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी ५ मे रोजी सकाळी हजारीबाग इथं उपस्थित होते. यापूर्वी, १९ जुलै रोजी सीबीआयने नीट- यूजी प्रश्नपत्रिका फूट प्रकरणी झारखंडमधील रांची येथून एमबीबीएसच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनीला ताब्यात घेतलं असल्याचं हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेनं आपल्या बातमीत म्हटलं आहे.

## दुर्घटना

केदारनाथ- गौरीकुंड पादचारी मार्गावर चिरबासा इथं आज सकाळी झालेल्या भूस्खलनात 3 भाविकांचा मृत्यू झाला आणि ५ भाविक जखमी झाले आहेत. मृतकांमध्ये नागपूरच्या किशोर अरुण पराटे आणि जालना स्थित सुनील महादेव काळे यांचा समावेश आहे.

## हवामान

काल आणि आज संपूर्ण विदर्भात मुसळधार पाऊस झाल्यामुळे अनेक गावांमध्ये पुरसदृष्य स्थिती निर्माण झाली. तर अनेक गावांचा संपर्क तुटला. यात चंद्रपूर येथील चिचपल्ली गावातील मामा तलाव फुटल्यामुळे ३०० घरांमध्ये पाणी शिरल्याचे कळताच पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी तातडीने मदतकार्य पोहोचविण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात गत दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील काही तालुक्यात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. घरांचे नुकसान झालेल्या नागरिकांना तसेच पुरात अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढून स्थलांतरीत केलं गेलं आहे.सर्व पूर पिडीतांची जिल्हा प्रशासामार्फत योग्य काळजी घेण्यात येत असून राहण्याची व भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. दरम्यान आज झालेल्या मुसळधार पावसामुळे जवळपास 740 घरांचे अंशत: नुकसान झालं आहे. घरांचे तसेच शेताचे नुकसान झालेल्या नागरिकांना मदत करण्यासाठी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी संबंधित तहसीलदार तसेच कृषी अधिकारी यांना पंचनामा करण्याचे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. यवतमाळ जिल्ह्यात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे मारेगाव तालुक्यातील कोसारा सोईट हा मार्ग बंद झाला आहे. वर्धा नदीला आलेल्या पुरामुळे कोसारा सोईट पुलावरून तीन फूट उंच पाणी वाहत आहे. त्यामुळे दोन्ही बाजूंनी बॅरिगेट्स लावून हा मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आलेला आहे. जिल्ह्यात 24 मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली असून यात सतरा घरांचे अंशतः नुकसान झाले आहे. सरासरी पर्जन्यमान 43% एवढं झालं असून अनेक भागातील शेती अतिवृष्टीमुळे जलमय झाल्याचं चित्र आहे. भंडारा जिल्ह्याच्या सीमावर्ती भागासह दऱ्याखोऱ्यांमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातून वाहणाऱ्या वैनगंगा नदी आणि पवनीजवळील गोसेखुर्द पाटबंधारे प्रकल्पाच्या पाणीपातळीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. परिणामी पाणीपातळी नियंत्रित करण्यासाठी गोसेखुर्द धरणाचे ३३ दरवाजे उघडण्यात आले आहेत. यात २३ दरवाजे एक मीटरने तर १० दरवाजे अर्धा मीटरने उघडण्यात आले असून नदीकाठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. गडचिरोली जिल्ह्यात रात्रीपासून पाऊस सुरू

असून, गडचिरोली-नागपूर, गडचिरोली-चामोर्शी, आलापल्ली- भामरागड, आलापल्ली-सिरोंचा या चार राष्ट्रीय महामार्गांसह ३० मर्गांवरील वाहतूक ठप्प झाली आहे. आज नागपुरात दुपारी अनेक ठिकाणी थोड्या काळासाठी मुसळधार पाऊस झाला. मागील २४ तासांत नागपुरात १६४ मिलीमीटर पावसाची नोंद हवामान खात्याने केली आहे. काल नागपुरात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक नागरिकांचं नुकसान झालं आहे. शासनानं या नागरिकांना झालेल्या नुकसनाची भरपाई देण्याची मागणी नागपूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आणि उत्तर नागपूरचे आमदार डॉ. नितीन राऊत यांनी केली आहे.

दरम्यान, आज चंद्रपूर आणि भंडारा जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट तर नागपूर आणि गोंदिया साठी ऑरेंज अलर्ट जरी करण्यात आला आहे. उद्या भंडार्यासाठी ऑरेंज अलर्ट तर संपूर्ण विदर्भासाठी पावसाचा येल्लो अलर्ट जारी करण्यात आला असून नागरिकांनी काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सूचना

मुंबईसह कोकणातील काही जिल्ह्यांमध्ये आज मुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्यान दिला आहे. त्याचबरोबर इतरही काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यापार्श्वभूमीवर SDRF, जिल्हा प्रशासन, पोलीस, महापालिका, नगरपालिका आदी विविध स्थानिक स्वराज्य संस्था यांनी सतर्क रहाव आणि नागरिकांना सर्वतोपरी मदत करावी, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. सर्व प्रशासनाने अलर्ट राहावे, हवामान खात्याकडून तसच आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून परिस्थितीची वेळोवेळी माहिती घेण्यात यावी आणि त्यानुसार नियोजन आणि व्यवस्थापन करावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

## गुरुपौर्णिमा

आज गुरू पौर्णिमा अनेक ठिकणी साजरी होत आहे. गुरुपौर्णिमा आषाढ महिन्यातील पौर्णिमेला येते. या दिवशी शिक्षक आणि आध्यात्मिक गुरूंबद्दल कृतज्ञता व्यक्त केली जाते. ऋषी वेद व्यास यांच्या जयंतीनिमित्त या दिवसाला व्यास पौर्णिमा असंही म्हणतात.

आज गुरुकुंज मोझरीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या समाधीवर गुरुपौर्णिमा उत्सव आयोजित करण्यात आला आहे. पहाटे तीर्थस्थापणेने इथे गुरुपौर्णिमा उत्सवाला प्रारंभ झाला. तर शेगाव इथं आज संत श्री गजानन महाराज संस्थान मध्ये श्रींच्या दर्शनासाठी भक्तांनी गर्दी केली होती. याशिवाय ठिकठिकाणी भक्तिपूर्ण आणि सांस्कृतिक कार्यक्रम आज आयोजित करण्यात आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे आज गुरुपौर्णिमेनिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

######